# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठ, नागपूर रिट याचिका क्र.
**{सा.बां.वि. झोन क्र. ०२}** 4959/2024 मध्ये दिलेल्या दि. 30/09/2024 च्या निकालाच्या अनुषंगाने दिवानी नोटीस अवमानना केल्याबद्दल शांतता झोन घोषित करण्यासाठी नोटीफिकेशन घोषीत करण्याबाबत.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने दि. 15/10/2025 रोजी प्राप्त झालेल्या पत्रान्वये मा. उच्च न्यायलयाच्या आदेश दि. 30/09/2024 रिट याचिका क्र. 4959/2024 अन्वये दिलेल्या आदेशानुसार दिवाणी अवमानना केल्याबाबत पत्र प्राप्त झालेले होते. त्या अनुषंगाने सदर एरिया रामदासपेठ येथील असुन 1) शेषराव वानखेडे विद्यानिकेतन शाळा (मोर हिंदी) खेळाचे मैदान 2) अर्नेजा हार्ट हॉस्पीटल व 3) बिसने हॉस्पीटल या तिन्ही ठिकाणापासून 100 मिटर अंतरापर्यंत वर नमुद परिसारात शांतता श्रेत्र झोन अंतर्गत म्हणुन घोषित करावयाचे अनुषंगाने विधी विभागाकडून अभिप्राय प्राप्त करण्यात आला असून नस्तीत ज्ञापन पान क्र. 16 वर संलग्न आहे.

शासन निर्णय क्र. ध्वनीप्र-2000 प्र.24/ता. क्र.-3 दि. 16/08/2000 आणि दि. 15/06/2001 अन्वये, म.न.पा., नागपूर मा. आयुक्त कार्यालयाचे आदेश क्र. आ.का.124/2020-21 दि. 17/02/2021 रोजीच्या आदेशान्वये विधी अधिकारी यांनी सदर ठिकाणी शांतता श्रेत्र परिसर झोन अंतर्गत घोषित करण्या संदर्भात अभिप्राय दिल्याप्रमाणे तसेच त्या पुर्वी प्रशासकीय ठराव मान्य करून त्यानंतरच सदर परिसरातील भाग शांतता श्रेत्र तसेच नोटीफीकेशन करण्याची प्रक्रीया मान्य करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 60/मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 31/10/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभाग, धरमपेठ झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठ, नागपूर रिट याचिका क्र. 4959/2024 मध्ये दिलेल्या दि. 30/09/2024 च्या निकालाच्या अनुषंगाने दिवानी नोटीस अवमानना केल्याबद्दल शांतता झोन घोषित करण्यासाठी नोटीफिकेशन घोषीत करण्याबाबत.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने दि. 15/10/2025 रोजी प्राप्त झालेल्या पत्रान्वये मा. उच्च न्यायलयाच्या आदेश दि. 30/09/2024 रिट याचिका क्र. 4959/2024 अन्वये दिलेल्या आदेशानुसार दिवाणी अवमानना केल्याबाबत पत्र प्राप्त झालेले होते. त्या अनुषंगाने सदर एरिया रामदासपेठ येथील असुन 1) शेषराव वानखेडे विद्यानिकेतन शाळा (मोर हिंदी) खेळाचे मैदान 2) अर्नेजा हार्ट हॉस्पीटल व 3) बिसने हॉस्पीटल या तिन्ही ठिकाणापासून 100 मिटर अंतरापर्यंत वर नमुद परिसारात शांतता श्रेत्र

झोन अंतर्गत म्हणुन घोषित करावयाचे अनुषंगाने विधी विभागाकडून अभिप्राय प्राप्त करण्यात आला असून नस्तीत ज्ञापन पान क्र. 16 वर संलग्न आहे.

शासन निर्णय क्र. ध्वनीप्र-2000 प्र.24/ता. क्र.-3 दि. 16/08/2000 आणि दि. 15/06/2001 अन्वये, म.न.पा., नागपूर मा. आयुक्त कार्यालयाचे आदेश क्र. आ.का.124/2020-21 दि. 17/02/2021 रोजीच्या आदेशान्वये विधी अधिकारी यांनी सदर ठिकाणी शांतता श्रेत्र परिसर झोन अंतर्गत घोषित करण्या संदर्भात अभिप्राय दिल्याप्रमाणे तसेच त्या पुर्वी प्रशासकीय ठराव मान्य करून त्यानंतरच सदर परिसरातील भाग शांतता श्रेत्र तसेच नोटीफीकेशन करण्याची प्रक्रीया मान्य करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.